# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 01.02.2026** **वार- रविवार**

---

**अर्थसंकल्प**

आर्थिकवृद्धीदर वाढवणे, नागरिकांचं कौशल्य विकसित करणे आणि सर्व नागरिकांना सोयीसुविधा, सवलतींचा पुरेपूर लाभ देणे, या 3 कर्तव्यांवर आधारित असलेला अर्थसंकल्प केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज संसदेत सादर केला. 2026-27 या आर्थिक वर्षासाठी साडेत्रेपन्न लाख कोटींचा हा अर्थसंकल्प असून देशातल्या युवा शक्तीला केंद्रस्थानी ठेवून हा अर्थसंकल्प तयार करण्यात आला आहे.

देशातल्या महत्त्वाच्या औद्योगिक कॉरिडॉर्सच्या जवळ 5 शैक्षणिक परिसर विकसित करायची घोषणा अर्थमंत्र्यांनी आपल्या अर्थसंकल्पीय भाषणात केली. विविध शैक्षणिक क्षेत्रांमध्ये विद्यार्थिनींचा सहभाग वाढवण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात त्यांच्यासाठी वसतीगृह सुरू केली जाणार आहेत.

देशभरात दळणवळण सुविधा मजबूत करण्याच्या उद्देशानं विविध महानगरं जोडणाऱ्या रेल्वेच्या 7 हायस्पीड कॉरिडॉर्सची घोषणाही सितारमण यांनी केली. यामध्ये मुंबई-पुणे आणि पुणे-हैद्राबाद या मार्गांचा समावेश आहे. या अर्थसंकल्पाचं विविध स्तरातून स्वागत होत आहे.

**अर्थसंकल्प-प्रतिक्रिया**

पुणे-हैद्राबाद आणि मुंबई-पुणे हायस्पीड रेल कॉरिडोरमुळे राज्यातील दोन मोठ्या महानगरातील रहिवाशांना दिलासा मिळाला आहे असं असं मत बहुजन चळवळीतील नेते डॉ. हुलगेश चलवादी यांनी व्यक्त केलं.

**अर्थसंकल्प-प्रतिक्रिया**

यंदाच्या अर्थसंकल्पात पर्वतीय भागांच्या आर्थिकदृष्ट्या शाश्वत विकासाला आणि गिर्यारोहणाला पर्यटन क्षेत्रात धोरणात्मक स्थान देण्यात आलं आहे. या घोषणेचं, गिर्यारोहक उमेश झिरपे यांनी स्वागत केलं आहे.......

**बजेटमध्ये आजच्या जी गिर्यारोहण ट्रेकिंग यासाठीची जी योजना माननीय अर्थमंत्र्यांनी जाहीर केली आहे. हे ऐकून आम्हाला सगळ्यांचा आनंद झालाच आहे. पण आज या क्षेत्रात काम करणाऱ्या अनेकांना नक्कीच आनंद झाला असणार आहे. कारण आपल्या देशामध्ये इतक्या प्रचंड आणि इतक्या वैविध्यपूर्ण पर्वतरांगा आहेत. या ठिकाणी खरंच खूप मोठं पोटेंशियल आहे ट्रेकिंग साठी गिर्यारोहणासाठी कारण हे क्षेत्र असं होतं की खूप प्रचंड मोठ्या प्रमाणात वाढतंय आज अनेक जण साहस करू लागली आहेत की फक्त देशातील नाही तर जगभरातून साहसी पर्यटक, साहसी गिर्यारोहक यासाठी आपल्या देशात नक्की येतील आणि खूप मोठी चालना या क्षेत्राला मिळेल.**

**सोयाबीन खरेदी**

केंद्र सरकारनं यंदाच्या खरीप हंगामासाठी राज्याला सुमारे 18 लाख 50 हजार मेट्रिक टन सोयाबीन खरेदीचे उद्दिष्ट दिलं आहे. त्यापैकी 15 जानेवारी 2026 अखेर 6 लाख मेट्रिक टन म्हणजे उद्दिष्टाच्या केवळ 32 टक्क्यांइतकी सोयाबीन खरेदी पूर्ण झालेली आहे. 6 लाख मेट्रिक टन सोयाबीनच्या खरेदीची किंमत 3200 कोटी रुपये असून शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर

आत्तापर्यंत 2500 कोटी रुपये जमा झाले आहेत. उर्वरित 700 कोटी रुपये देण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती राज्य कृषी पणन मंडळाकडून देण्यात आली.

**शोकसभा**

राज्याचे माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांच्या विषयीच्या भावना व्यक्त करण्यासाठी येत्या मंगळवारी सकाळी साडेदहा वाजता बालगंधर्व रंगमंदिरात, पुणे जिल्हा शिक्षण मंडळानं जिल्ह्यातील शिक्षणसंस्थांसाठी शोकसभेचं आयोजन केलं आहे. या शोकसभेसाठी शिक्षणक्षेत्रातील सर्वांनी उपस्थित रहावं, असं आवाहन करण्यात आलं आहे.

**चाळ**

पुणे महानगरपालिका चाळ विभागात एकंदर 3 हजार 459 सदनिका आहेत. या वसाहतीमध्ये अनाधिकृत बांधकाम आणि अतिक्रमण होत असल्याच्या तक्रारी आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर यावर कारवाई करण्याचे आदेश अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी क्षेत्रीय कार्यालयांना दिले आहेत.

**एमआयटी**

एमआयटी विश्वशांती विद्यापीठ आणि एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंटतर्फे 22 वे 'भारत अस्मिता राष्ट्रीय पुरस्कार' जाहिर करण्यात आले आहेत. या वर्षी हे पुरस्कार बंगळूर येथील आयआयएमच्या प्राध्यापिका डॉ. श्रीवर्धनी के. झा, खासदार ज्योथिमणी सेन्नमलाई, अभिनेते आणि मानसोपचार तज्ज्ञ डॉ. मोहन आगाशे आणि सरोदवादक उस्ताद अमजद अली खान यांना प्रदान करण्यात येणार आहेत  अशी माहिती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. एम. चिटणीस यांनी पत्रकार परिषदेत दिली. पुरस्कार प्रदान समारंभ येत्या मंगळवारी 3 फेब्रुवारी रोजी, कोथरूड इथल्या विद्यापीठाच्या मैदानात आयोजित करण्यात आला आहे. प्रत्येकी अडीच लाख रूपये रोख, सन्मानपत्र आणि स्मृतीचिन्ह असं या पुरस्काराचं स्वरुप आहे.

**क्रीडा**

पुणे डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या वतीनं उद्यापासून जिल्हास्तरीय आंतर महाविद्यालयीन क्रीडा महोत्सवाला सुरुवात होत आहे. 5 फेब्रुवारी पर्यंत चालणाऱ्या या क्रीडा महोत्सवात जवळपास चौदाशे विद्यार्थी आणि विद्यार्थिनी भाग घेणार आहेत.

**बाजार समिती**

गुलटेकडी इथल्या पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज फळभाज्यांची मोठी आवक झाल्यानं फळ भाज्यांचे भाव घसरले आहेत तर हिरव्या मिरचीच्या भावात किंचित वाढ झाली आहे. पालेभाज्यांच्या भावातील मंदी या आठवड्यातही टिकून आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात उद्या कमाल 30 अंश तर किमान 17 अंश सेल्सियस तापमानाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. आकाश दुपारनंतर ढगाळ होण्याचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**